# मिरा भाईंदर महानगरपालिका

## माहिती व जनसंपर्क विभाग

## प्रेसनोट

- **मिरा भाईंदर महापालिकेद्वारे वाहन चालकांसाठी प्रशिक्षण शिबिराचे आयोजन**

दिनांक ०२ जानेवारी २०२५ रोजी रस्ता सुरक्षा अभियान अंतर्गत मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या वाहन चालक कर्मचारी प्रशिक्षण शिबिर केंद्राचे उद्‌घाटन मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या शुभहस्ते करण्यात आले. वाहन चालन प्रशिक्षण आणि संशोधन संस्था, पुणे यांच्यामार्फत सदरचे प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले आहे.

सध्या वाढत असलेल्या शहरीकरणाचा परिणाम म्हणून वाहनांची संख्या, गर्दी वाढत आहे अशा स्थितीत बस चालकांवर ताण येतो. वाहन चालकांना रोज या आव्हानांना सामोरे जावे लागते. अशा स्थितीत सतत दक्ष राहावे लागते, ज्यामुळे मानसिक ताण येतो. ताणाचे व्यवस्थापन आणि रस्ते-वाहतुकीबाबतच्या इतर बाबींवर चार दिवसीय प्रशिक्षण, वाहन चालन प्रशिक्षण आणि संशोधन संस्थेमार्फत देण्यात येत आहे. अनेक ठिकाणी वाहतूक अपघात होत असतात. मिरा भाईंदर महापालिका परिवहन उपक्रमाचे चालक स्वस्थ असावेत तसेच त्यांनी तणावमुक्त राहून कार्य केले पाहिजे यासाठी या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे असे मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांनी सांगितले.